Phone : Office : 08338-220112,
Website : www.devchandcollege.org
Principal Cell : 9901573365
Email:devchand_college@rediffmail.comp
rincipal@devchandcollege.org

Janata Shikshan Mandal's

# DEVCHAND COLLEGE

(Jain Religious Minority Institution)
Arjunnagar, Via- Nipani, Tal: Kagal, Dist : Kolhapur PIN – 591237
(Affiliated to Shivaji University) 'A' Grade Accredited by NAAC(3rd Cycle)

- Govt. App. Notification (Affi) Dt. 07-11-1969
- Jr. College – HSC – 1076 Dt. 19th Oct. 19 Oct. 1976

* U-Dies No. - 27340806306
* Jr. Code – 23-07-001
* M.C.V.C. Code – 23-07-901

दि. २२/०१/२०२२

प्रति,

मा.प्रा.डॉ.एकनाथ आळवेकर

(प्रमुख, मराठी विभाग डी.के.ए.एस.सी कॉलेज इचलकरंजी.)

महोदय,

आम्ही आमच्या महाविद्यालयाच्या मराठी विभागातर्फे मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करीत आहोत. आपण मराठी साहित्यातील एक नामवंत अभ्यासक आहात. आपल्या व्याख्यानाचा लाभ आमच्या विद्यार्थ्यांना मिळावा असे आम्हास मनापासून वाटते. तरी दि.२५/०१/२०२२ रोजी सकाळी ठीक १०.१५ वाजता आपण **साहित्य आणि जीवन** या विषयावर व्याख्यान देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतील अशी आशा वाटते.

कळावे, ही विनंती.

आपला

INCHARGE PRINCIPAL
DEVCHAND COLLEGE
Arjunnagar Dist. Kolhapur

Phone - Office : 08338-220112.
Website : www.devchandcollege.org
Principal Cell : 9901573365
Email devchand_college@rediffmail.comp
rincipal@devchandcollege.org

Janata Shikshan Mandal's

# DEVCHAND COLLEGE

(Jain Religious Minority Institution)
Arjunnagar, Via- Nipani, Tal: Kagal, Dist : Kolhapur PIN - 591237
(Affiliated to Shivaji University) 'A' Grade Accredited by NAAC(3rd Cycle)


- Govt. App. Notification (Affi) Dt. 07-11-1969 * U-Dies No. - 27340806306 * Jr. Code – 23-07-001
- Jr. College – HSC – 1076 Dt. 19th Oct. 19 Oct. 1976 * M.C.V.C. Code – 23-07-901


**InchargePrincipal :**
**Prof. Dr. P. P. Shah**
M. Sc. D.C.P. M. Phil. Ph. D.

**Ref. No. : 2021 /IND/**
**Date: 25/01/2022**

प्रति,

मा.प्रा.डॉ.एकनाथ आळवेकर
(प्रमुख, मराठी विभाग डी.के.ए.एस.सी कॉलेज इचलकरंजी.)

महोदय,

आम्ही आमच्या महाविद्यालयाच्या मराठी विभागातर्फे मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करीत आहोत. तरी दि.२५/०१/२०२२ रोजी आपण **साहित्य आणि जीवन** या विषयावर व्याख्यान देऊन विद्यार्थांना मार्गदर्शन केलेत; त्याबद्दल आम्ही आपले आभारी आहोत.

प्रेम व स्नेह आहेच तो असाच वृद्धिंगत होईल अशी अपेक्षा.

आपला

INCHARGE PRINCIPAL
DEVCHAND COLLEGE
Arjunnagar Dist. Kolhapur

1:31 PM

IMG-20220131-WA0010.jpg

# 'देवचंद'मध्ये मराठी भाषा संवर्धन पंधरवडा

सकाळ वृत्तसेवा

निपाणी, ता. ३० : अर्जुननगर (ता. कागल) येथील देवचंद महाविद्यालयात मराठी विभाग आणि शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ कोल्हापूर यांच्या संयुक्त सहकार्याने आयोजित 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा'ची सांगता झाली. त्यानिमित्त प्रा. डॉ. एकनाथ आळवेकर (इचलकरंजी) यांचे ऑनलाईन विशेष व्याख्यान झाले. 'साहित्य आणि जीवन' या विषयावर डॉ. आळवेकर यांनी मार्गदर्शन केले.



प्रा. डॉ. एकनाथ आळवेकर

अध्यक्षस्थानी प्रा. नानासाहेब जामदार होते. स्वागत व प्रास्ताविक मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. रमेश साळुंखे यांनी केले. त्यानंतर डॉ. आळवेकर यांनी साहित्य व जीवन याचा संबंध, साहित्य वाचनाचा वाचकांवर होणारा परिणाम, विविध साहित्यकृतीतून चित्रित केलेले जीवनानुभव, वाचन संस्कृती चळवळ, लेखनाचे महत्त्व आणि मराठी भाषेतून विद्यार्थ्यांना करिअरच्या संधी याबद्दल मार्गदर्शन केले. भाषेची कौशल्ये, भाषेचे महत्त्व, भाषेतील सजगता, विविध शब्दांचे संकलन आणि त्यातून बोलींचे, भाषेचे जतन करण्याची गरज व्यक्त केली. शिवाय लेखकांनी साहित्यकृतीतून अनुभवविश्व मांडताना ते सविस्तर मांडावे, त्यात संकुचितपणा न आल्यास साहित्य समृद्ध होत असल्याचे सांगितले. प्रभारी प्राचार्य डॉ. प्रशांत शाह यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास प्रा. डॉ. तानाजी पाटील, प्रा. विष्णू पाटील, प्रा. शिवाजी कुंभार यांच्यासह शिक्षक विद्यार्थी उपस्थित होते.

प्रा. प्रवीणसिंह शिलेदार यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रा. प्रकाश पाटील यांनी आभार मानले. प्रा. आशालता खोत यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमासाठी जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष श्रीमान आशिषभाई शाह यांचे सहकार्य लाभले.

# मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याची सांगता

निपाणी (पुढारी वृत्तसेवा) : देवचंद महाविद्यालय अर्जुननगर मराठी विभाग आणि शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याची सांगता झाली. या कार्यक्रमात विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. प्रमुख वक्ते म्हणून प्रा. डॉ. एकनाथ आळवेकर (इचलकरंजी) उपस्थित होते. 'साहित्य आणि जीवन' या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी प्रा. नानासाहेब जामदार होते. त्यांनी भाषेची कौशल्ये, भाषेचे महत्त्व, भाषेतील सजगता, विविध शब्दांचे संकलन आणि या सर्वांतून बोलींचे, भाषेचे जतन करावे असे मत व्यक्त केले. स्वागत व प्रास्ताविक मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. रमेश साळुंखे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष आशिषभाई शाह यांचे प्रोत्साहन तर महाविद्यालयाचे प्रभारी प्रा. डॉ. प्रशांत शाह यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाला प्रा. डॉ. तानाजी पाटील, प्रा. विष्णू पाटील, प्रा. शिवाजी कुंभार आदी उपस्थित होते. पाहुण्यांचा परिचय प्रा. प्रवीणसिंह शिलेदार यांनी करून दिला. सूत्रसंचालन प्रा. आशालता खोत यांनी केले. प्रा. प्रकाश पाटील यांनी आभार मानले.

Belgaum Edition
Jan 30, 2022 Page No. 2
newspaper.pudhari.co.in